# कृषि उत्पन्न बाजार समिती,श्रीगोंदा
# तालुका श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर


Agricultural Produce Market committee,Shrigonda
Tal- Shrigonda Dist- Ahilyanagar.(Maharashtra)

| |
|---|
| प्रमुख बाजार श्रीगोंदा (०२४८७)२२२३३२, उपबाजार काष्टी/घोगरगाव/चिंभळे/कोळगाव |
| Email- am shrigonda@msamb.com |


**जावक क्र. ए.पी.एम.सी./एस./सूचना/ ७५/२०२५** **दिनांक ०३/०६/२०२५.**

**जाहीर सूचना**

महाराष्ट्र गोसेवा आयोग पुणे यांचेकडील दि. २७/०५/२०२५ रोजीचे ईमेल संदेशानुसार बकरी ईद सन – २०२५ राज्यात साजरी करताना महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ (४ मार्च २०१५) ची अंमलबजावणी करणेबाबत पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच जा. क्र. १४४२/ जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त अहिल्यानगर दि. २९/०५/२०२५ चे पत्र.

**त्या अनुषंगाने कृषि उत्पन्न बाजार समिती, श्रीगोंदा चे उपबाजार काष्टी येथील दि. ०७/०६/२०२५ वार शनिवार रोजी भरणारा जनावरे बाजार वरील पत्राचे उल्लघंन होणार नाही व कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने बंद ठेवण्यात येत आहे.**

तरी सर्व जनावरे (गाय, बैल, म्हैस, शेळी, मेंढी, बोकड) खरेदी विक्री करणाऱ्या सर्व शेतकरी व व्यापारी व संबंधित घटकांना सूचित करण्यात येते कि, **दि. ०७/०६/२०२५ वार शनिवार रोजी उपबाजार काष्टी येथे भरणारा जनावरे बाजार कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून बाजार बंद ठेवण्यात येत असून कोणीही आपली जनावरे विक्रीस आणू नये.**

तसेच या पुढील दि. १४/०६/२०२५ वार शनिवार रोजी भरणारा जनावरे बाजार नियमितपणे भरविण्यात येईल. याची सर्व संबंधित घटकांनी नोंद घ्यावी व सहकार्य करावे.

कृषि उत्पन्न बाजार समिती, श्रीगोंदा ता.श्रीगोंदा जि.अहिल्यानगर

उपसभापती
**कृषि उत्पन्न बाजार समिती, श्रीगोंदा**
**तालुका श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर**

Scanned with OKEN Scanner